साप्ताहिक

■ POSTEL REGD NO. AKOLA DN./285/2025-2027

स्थापना : जुन २००८

# पिंगलाक्षी एक्सप्रेस



मुख्य संपादक : गजानन बानोरे 9420100590, 9075407343 R.N.I. No. MAHMAR/2008/24720

● रिसोड जि.वाशीम ● वर्ष १८ ● अंक २१ ● मंगळवार, दि. १४ ते २१ ऑक्टोंबर २०२५ ● पृष्ठे ४ ● किंमत १ रू.

## म हत्वाचे

### मंगरुळपीर येथे पंचायत समिती आरक्षण सोडत सभा १३ ऑक्टोबरला

वाशिम (जिमाका)महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ आणि महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या (जागांच्या आरक्षणाची पद्धत व चक्रानुक्रम) नियम २०२५ नुसार पंचायत समित्यांमधील जागांचे आरक्षण निश्चित करण्याची प्रक्रिया सुरू आहे. या अनुषंगाने मंगरुळपीर पंचायत समिती क्षेत्रासाठी आरक्षण निश्चित करण्यासाठी सोडत पद्धतीने विशेष सभा आयोजित करण्यात आली आहे. ही सभा १३ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी ३ वाजता मंगरुळपीर येथील जुनी पंचायत समिती सभागृहात पार पडणार आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग तसेच त्या प्रवर्गांतील स्त्रिया आणि सर्वसाधारण स्त्रियांसाठी राखीव जागा निश्चित करण्याची कार्यवाही या सभेत केली जाणार आहे. पंचायत समिती क्षेत्रातील संबंधित नागरिकांना सभेस उपस्थित राहण्याचे आवाहन तहसीलदार रवी राठोड यांनी केले आहे.

### विभागीय आयुक्तालयात सोमवारी लोकशाही दिन

वाशिम, दि. १२ ऑक्टोबर (जिमाका): विभागीय लोकशाही दिन प्रत्येक महिन्याच्या दुस-या सोमवारी आयोजित करण्यात येतो. त्यानुसार सोमवारी (दि. १३ ऑक्टोबर) रोजी सकाळी ११ वाजता विभागीय आयुक्त कार्यालयात लोकशाही दिनाच्या आयोजन करण्यात आले आहे. विभागीय लोकशाही दिनासाठी यापूर्वी प्राप्त तक्रारींचे निराकरण करण्यात येईल. विभागीय लोकशाहीदिनात तक्रार नोंदविण्यासाठी नागरिकांनी, तसेच महिलांनी आपले अर्ज (तालुका, जिल्हा, लोकशाहीदिनानंतर) विहित नमुन्यात १५ दिवस आधी दोन प्रतीत पाठविणे आवश्यक असते. तक्रार dcgamravatigmail.com किंवा dcg_amravati@rediffmail.com या ई-मेलवर विहित नमुन्यात पाठविण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

### कामगार मंत्री ॲड.आकाश फुंडकर यांच्याहस्ते उद्घाटन

मुंबई, दि. ७ : कामगार विभागाच्या https://labour. maharashtra. gov.in या वेबसाईटचे उद्घाटन कामगार मंत्री ॲड.आकाश फुंडकर यांच्या हस्ते मुंबईत करण्यात आले. याचबरोबर कामगार विभागाने विकसित केलेल्या ‘चॅट बोट’ला ‘श्रमदूत’ असे नाव देण्यात आले असून, या माध्यमातून कामगार व कारखानदारांना त्वरित मार्गदर्शन व सहाय्य मिळणार आहे.

राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या दीडशे दिवसांच्या विशेष कार्यक्रमांतर्गत कामगार विभागाने नवीन वेबसाईटची निर्मिती केली आहे. या वेबसाईटमध्ये राज्यातील सर्व कारखानदार तसेच कामगार बांधवांना उपयुक्त ठरणारी विविध माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आली आहे. या उपक्रमाबाबत कामगार मंत्री ॲड.फुंडकर यांनी कामगार विभागाला आवश्यक सूचना व मार्गदर्शन केले. कामगार, कारखानदार, सर्वसामान्य नागरिक यांच्यासह दिव्यांग व्यक्तींना सुद्धा वेबसाईट वापरायला अत्यंत सोपी असावी, असेही मंत्री ॲड.फुंडकर यांनी सांगितले.

## ■ २५१ तालुके पूर्णतः तर ३१ तालुके अंशतः आपत्तीग्रस्त म्हणून घोषित

# आपत्तीग्रस्त तालुक्यांसाठी विशेष मदत पॅकेज, सवलती लागू

### ■ आपदग्रस्त तालुक्यातील बाधितांना दुष्काळ सदृष्य परिस्थितीत लागू असणाऱ्या सवलती

**मुंबई, दि. ११ : राज्यात जून ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत अतिवृष्टी, पूर आणि विविध नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या मोठ्या नुकसानीच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने २५१ तालुके पूर्णतः तर ३१ तालुके अंशतः आपत्तीग्रस्त/अतिवृष्टीग्रस्त म्हणून घोषित करून आपत्तीमुळे बाधितांना विशेष मदत पॅकेज आणि विविध सवलती लागू केल्या आहेत. तसेच आपदग्रस्त तालुक्यातील बाधितांना दुष्काळ सदृष्य परिस्थितीत लागू असणाऱ्या सवलती देण्यास मान्यता देण्यात आल्या आहेत.**



या संदर्भातील शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे, अशी माहिती मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी दिली.

अतिवृष्टी व पुरामुळे शेतीपिकांचे नुकसान, शेतजमीन वाहून जाणे, घरांची पडझड, जनावरांची हानी आणि मालमत्तेचे नुकसान झाले आहे. या सर्व आपदग्रस्तांना तातडीने दिलासा मिळावा म्हणून राज्य शासनाने हे विशेष पॅकेज लागू केले आहे. या विशेष पॅकेजमुळे बाधित पिके, शेती, घरे, जनावरे, मत्स्यव्यवसाय, पायाभूत सुविधा दुरुस्तीस मोठा दिलासा मिळणार असल्याचा विश्वास मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी व्यक्त केला.

जून ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत अतिवृष्टी व पुरामुळे बाधित २५१ पूर्णतः व ३१ अंशतः बाधित तालुक्यातील बाधित पिकांचे तातडीने पंचनामे करण्यात आले. जून ते ऑगस्ट २०२५ या कालावधीत २६.६९ लाख हेक्टर तर सप्टेंबर २०२५ मध्ये जवळ जवळ ३९ लाख हेक्टर अशा सुमारे ६५ लाख हेक्टर क्षेत्रावरील शेत पिकांचे नुकसान झाले असल्याचेही मदत व पुनर्वसन मंत्री श्री. जाधव-पाटील यांनी सांगितले

अतिवृष्टी व पुरामुळे पूर्णतः बाधित तालुके - पालघर :- पालघर, डहाणू, तलासरी, विक्रमगड (चार तालुके) नाशिक- मालेगाव, निफाड, नांदगाव, सटाणा, दिंडोरी, सुरगाणा, नाशिक, त्र्यंबकेश्वर, पेठ, सिन्नर, चांदवड, येवला ( १२ तालुके) जळगांव- एरंडोल, पारोळा, धरणगाव, पाचोरा, जामनेर, जळगाव, भडगाव, अमळनेर, रावेर, चाळीसगाव, भुसावळ, बोदवड, मुक्ताईनगर (१३ तालुके अहिल्यानगर- अहिल्यानगर, शेवगाव, कर्जत, पाथर्डी, नेवासा, राहाता, श्रीरामपूर, जामखेड, राहुरी, श्रीगोंदा, कोपरगाव ( ११ तालुके) सोलापूर- उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, बार्शी, अक्कलकोट, पंढरपूर, मोहोळ, मंगळवेढा, माळशिरस, माढा, करमाळा, सांगोला ( ११ तालुके) सांगली- मिरज, वाळवा, शिराळा, पलूस, तासगाव, कवठेमहांकाळ, विटा, आटपाडी, जत ( नऊ तालुके) सातारा- कोरेगाव, खटाव, माण ( तीन तालुके) कोल्हापूर- करवीर, राधानगरी, गगनबावडा, आजरा, चंदगड ( पाच तालुके) छत्रपती संभाजीनगर- छत्रपती संभाजीनगर, कन्नड, सोयगाव, पैठण, वैजापूर, गंगापूर, खुलताबाद, सिल्लोड, फुलंब्री ( नऊ तालुके) जालना- बदनापूर, घनसावंगी, अंबड, जालना, परतूर, मंठा, भोकरदन, जाफ्राबाद ( आठ तालुके) बीड- बीड, गेवराई, माजलगाव, केज, आंबेजोगाई, परळी, आष्टी, पाटोदा, शिरूर कासार, धारूर, वडवणी ( ११ तालुके) लातूर - लातूर, औसा, रेणापूर, निलंगा, शिरुरअनंतपाळ, देवणी, उदगीर, जळकोट, अहमदपूर, चाकूर ( १० तालुके) धाराशिव- धाराशिव, कळंब, भूम, वाशी, तुळजापूर, लोहारा, परांडा, उमरगा ( आठ तालुके) नांदेड- कंधार, किनवट, मुदखेड, भोकर, अर्धापूर, माहूर, नांदेड, लोहा, मुखेड, देगलूर, बिलोली, धर्माबाद, नायगाव, हदगाव, हिमायतनगर, उमरी ( १६ तालुके) परभणी- पूर्णा, पालम, परभणी, सोनपेठ, जिंतूर, गंगाखेड, सेलू, मानवत, पाथरी ( नऊ तालुके) हिंगोली- हिंगोली, औंढा नागनाथ, कळमनुरी, सेनगाव, वसमत ( पाच तालुके) बुलढाणा- चिखली, सिंदखेडराजा, देऊळगावराजा, लोणार, शेगाव, मोताळा, बुलढाणा, खामगाव, मेहकर, मलकापूर, जळगाव जामोद ( ११ तालुके) अमरावती- अमरावती, भातुकली, चांदूर रेल्वे, नांदगाव खंडेश्वर, धामणगाव रेल्वे, अचलपूर, अंजनगाव सुर्जी, तिवसा, धारणी, चिखलदरा, वरुड, मोर्शी, चांदुरबाजार, दर्यापूर ( १४ तालुके) अकोला- अकोट, अकोला, पातूर, तेल्हारा, मुर्तीजापूर, बाळापूर, बार्शी टाकळी ( सात तालुके)

वाशिम- वाशीम, रिसोड, मालेगाव, मंगळूरपीर, कारंजा, मानोरा ( सहा तालुके) यवतमाळ- पुसद, यवतमाळ, बाभूळगाव, मारेगाव, महागाव, उमरखेड, कळंब, घाटंजी, राळेगाव, दारव्हा, आर्णी, नेर, दिग्रस, पांढरकवडा, वणी, झरी जामणी ( १६ तालुके) वर्धा- वर्धा, सेलू, देवळी, आर्वी, समुद्रपूर, हिंगणघाट, कारंजा, आष्टी ( आठ तालुके) नागपूर- नागपूर, कामठी, सावनेर, पारशिवनी, मौदा, भिवापूर, कळमेश्वर, काटोल, रामटेक, हिंगणा, उमरेड, कुही, नरखेड ( १३ तालुके) भंडारा- साकोली, भंडारा, मोहाडी, तुमसर, पवनी, लाखनी, लाखंदूर ( सात तालुके) गोंदिया- देवरी ( एक तालुका) चंद्रपूर- चंद्रपूर, भद्रावती, राजूरा, बल्लारपूर, कोरपना, मूल, वरोरा, सावली, चिमूर, नागभिड, सिंदेवाही, पोंभुर्णा, जिवती, ब्रम्हपुरी ( १४ तालुके) गडचिरोली- गडचिरोली, धानोरा, मूलचेरा, आरमोरी, कुरखेडा, अहेरी, सिरोंचा, भामरागड, एटापली, देसाईगंज (वडसा) (१० तालुके)

अतिवृष्टी व पुरामुळे अंशतः बाधित तालुके- नाशिक - कळवण, देवळा, इगतपुरी (तीन तालुके) धुळे - धुळे, साक्री, शिंदखेडा (तीन तालुके) अहिल्यानगर - पारनेर, संगमनेर, अकोले (तीन तालुके) पुणे - हवेली, इंदापूर (दोन तालुके) सांगली - कडेगांव (एक तालुका) सातारा - सातारा, कराड, पाटण, फलटण, जावळी (पाच तालुके) कोल्हापूर - कागल, शिरोळ, पन्हाळा (तीन तालुके) बुलढाणा - नांदुरा, संग्रामपूर (दोन तालुके) गोंदिया - तिरोडा, गोंदिया, गोरेगाव, मोरअर्जुनी, सालेकसा, सडक अर्जुनी, आमगाव (सात तालुके) गडचिरोली - चारमोशी, कोरची (दोन तालुके) अंशतः बाधित तालुक्यांमध्ये प्रत्यक्ष बाधित मंडळ सावलतीस पात्र असतील

### अतिवृष्टीग्रस्त शेतकरी मदतीबद्दल खा.अनुप धोत्रे,अनंतराव देशमुख यांनी मानले मुख्यमंत्री फडणवीस यांचे आभार





« मालेगाव|प्रतिनिधी »

राज्याचे अभ्यासू मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अकोला व वाशिम जिल्ह्यातील काही वगळलेल्या तालुक्यांचा परत सामावेश अतिवृष्टी मदत पॅकेजमध्ये केल्याबद्दल खासदार अनुप धोत्रे, मा. मंत्री,मा.खा.अनंतराव देशमुख, आणि सकाळपासून शेतकरी हितासाठी कामाला लागलेले सुरेश मुंडे यांनी मानले मुख्यमंत्री महोदयांचे मनापासून आभार संकटाच्या कठीण काळात शेतकऱ्यांसाठी धावून आल्याबद्दल सर्वांचे देवा भाऊ अशा शब्दात अभिनंदन करून शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात दिलासा मिळाला आहे विशेष म्हणजे दिवाळी पूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यात मदतीची रक्कम जमा करण्याचे अभिवचन सरकारने दिल्या असल्याने शेतकऱ्यांची दिवाळी अंधारात जाणार नाही याची काळजी शासनाने, घेतली असल्याने खासदार धोत्रे, नकुल दादा देशमुख, सुरेश मुंडे,यांनी राज्याचे मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री, कृषी मंत्री ,आणि महसूल मंत्री, यांचे विशेष आभार मानले देवा भाऊचे सरकार म्हणजे शेतकऱ्यांच्या हिताचे सरकार त्यामुळे शेतकरी वंचित राहणार नाही याची काळजी घेणे हे आमचे महत्त्वाचे पाऊल राहणार असल्याचे बोलले गेले..

# शिक्षकांवर टांगती तलवार का ?

संपूर्ण देशात पहिली ते आठवीपर्यंतच्या वर्गाचे शिक्षक सध्या मानसिक तणावाचा सामना करत आहेत. यामागचे कारण म्हणजे सर्वोच्च न्यायालयाने शिक्षकांना शिक्षक पात्रता परीक्षा म्हणजेच टीईटी उत्तीर्ण करण्याचा दिलेला आदेश. टीईटीसंदर्भात सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय योग्य असू शकतो. न्यायालयाने नियम आणि कायद्याच्या अनुषंगाने निकाल दिला आहे. परंतु हा निर्णय व्यावहारिक आहे का? असा प्रश्न उपस्थित होतो. सर्वोच्च न्यायालयाने त्यांचा निर्णय दिला असला तरी देशाचे संसद काय करत आहे. या मुद्द्यावर राजकीय नेत्यांनी मौन का बाळगले आहे? ज्या शिक्षकांनी २० ते २५ वर्षे सेवा केली आहे, म्हणजे ते आता ५० ते ५५ वयोगटात असतील, त्यांच्यासाठी हा निर्णय व्यावहारिक आहे का? गेल्या काही काळापासून केंद्र आणि राज्य सरकार शिक्षकांवर विविध बाजूंनी दबाव टाकत आहेत. ज्ञानदान करण्याव्यतिरिक्त शिक्षकांकडून असंख्य कामे करून घेतली जात आहेत. असे असतानाही शिक्षक कामे करत नसल्याचे सांगून त्यांच्या कार्यशैलीवरच प्रश्न उपस्थित केले जात आहेत. अलीकडेच सर्वोच्च न्यायालयाने निर्णयात म्हटल्यानुसार, ज्या शिक्षकांची सेवा पाच वर्षांपेक्षा अधिक राहिलेली आहे, त्यांना दोन वर्षांच्या आत टीईटी उत्तीर्ण करावे लागेल. या काळात टीईटी परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास त्यांना नोकरीवर पाणी सोडावे लागणार किंवा त्यांना सक्तीची सेवानिवृत्ती घ्यावी लागेल. अर्थात ज्यांची सेवा पाच वर्षांपेक्षा कमी राहिली आहे, त्यांना टीईटीचे बंधन घातलेले नाही. मात्र बढतीसाठी ते अपात्र राहतील. हा नियम सरकारी आणि खासगी या दोन्ही प्रकारच्या शिक्षकांवर लागू राहील. अर्थात तूर्त अल्पसंख्याक विद्यालयांना यातून वगळले आहे. अल्पसंख्याक प्रकरण सर्वोच्च न्यायालयाच्या मोठ्या पीठाकडे सोपविले आहे. पण एकुणातच या निर्णयाची काटेकोरपणे अंमलबजावणी केली जाणार असल्याचे म्हटले आहे. शिक्षकांच्या मते, भरतीच्या वेळी संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करूनच सेवेत दाखल झालो आहोत. नियुक्ती होताना सर्व नियम आणि अटींचे पालन झाले आहे. त्यामुळे आता सेवेच्या शेवटच्या टप्प्यात टीईटी उत्तीर्ण करण्याबाबतचा आदेश न्यायसंगत राहू शकतो का? प्रत्यक्षात ५० ते ५५ वर्षांपेक्षा अधिक वयोगटातील नागरिक अनेक प्रकारच्या मानसिक ताणाला सामोरे जात असतात. या वयात तो शिक्षित असू शकतो, मात्र तुम्ही उत्तीर्ण झाला नाहीत तर नोकरी गमवावी लागेल, असे जर सांगितले तर मानसिक ताणात आणखीच भर पडेल. या कारणामुळे शिक्षक हैराण झाले आहेत.

शिक्षकांसाठी वेळोवेळी अनेक प्रकारचे रिफ्रेशर अभ्यासक्रम सुरू असतात. पण त्यापेक्षा सरकारने शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षण दिले असते तर आणखी बरे झाले असते. याप्रकारचा अतार्किक निर्णय शिक्षकांवर थोपविणे अन्यायकारक आहे. टीईटीसंबंधी हा निर्णय अनेकार्थानेही तार्किक नाही. शाळेत मोठ्या संख्येने एमपीएड, बीपीएड, एमएड, बीएड, डीएड, बीटीसी (बेसिक ट्रेनिंग सर्टिफिकेट) अभ्यासक्रम पूर्ण केलेले शिक्षक आहेत. अनेक शिक्षक अनुकंपा तत्त्वावर रुजू झालेले असतात आणि तेही नियमांच्या चौकटीतच. शिवाय भरतीचे निकष वेगवेगळ्या काळात वेगळे ठेवण्यात आलेले आहेत.

उत्तर प्रदेशात १९९८ च्या अगोदर बारावी उत्तीर्ण आणि बीटीसीच्या आधारावर शिक्षकांची भरती केली जात असे. १९९९ पासून त्याची पात्रता पदवीवर आणली आणि यात काही बीएड आणि बीपीएड मंडळी देखील दाखल झाली. म्हणजे तत्कालिन काळातील निकषाचे पालन करत उमेदवार शिक्षक क्षेत्रात दाखल झाला आहे. यातील एक व्यावहारिक अडचण म्हणजे जर एखादा बारावी उत्तीर्ण शिक्षकाला टीईटी उत्तीर्ण व्हायचे असेल तर त्याला अगोदर पदवी परीक्षा उत्तीर्ण व्हावी लागेल आणि नंतर बीटीसीचे प्रशिक्षण घ्यावे लागेल. हे सर्व सोपस्कार पार पाडल्यानंतर टीईटी करू शकेल. म्हणजेच यात बराच काळ जाऊ शकतो. दुसरीकडे टीईटी उत्तीर्ण होण्यासाठी केवळ दोनच वर्षांची मुदत दिली आहे.

शिक्षक क्षेत्राप्रमाणे अन्य क्षेत्रात इतके निकष सातत्याने बदलण्याचा अनुभव क्वचितच आला असेल. कारण केंद्र आणि राज्यनिहाय शिक्षक होण्याची पात्रता बदलत गेली आहे. सरकारकडून नेहमीच शिक्षकांना अनेकदा कामाचा ताण दिला गेला आहे.

# तंबाखूमुक्त युवा अभियान कार्यक्रम व रॅलीने दिला आरोग्यदायी समाजाचा संदेश



**वाशिम,दि.१० ऑक्टोबर (जिमाका) जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा रुग्णालय, वाशिम येथे तंबाखूमुक्त युवा अभियान मार्गदर्शन व रॅली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अविनाश पुरी होते.**

या प्रसंगी मानसोपचार तज्ज्ञ डॉ. राहुल डोंगरे, वैद्यकीय अधिकारी डॉ. नागेश शिरसाट, दंत विभागाचे अधिकारी डॉ. अविनाश सोनूने, डॉ. रणजीत गंडागोळे, डॉ. धनंजय कव्हर, दंत तंत्रज्ञ भाग्यश्री मनवर तसेच तंबाखू नियंत्रण कक्षाचे अधिकारी राम सरकटे आणि रामकृष्ण धाडवे उपस्थित होते.

शासकीय परिचर्या प्रशिक्षण विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी रॅलीत सहभागी होऊन नागरिकांमध्ये तंबाखूविरोधी जनजागृती केली. या उपक्रमातून तंबाखूच्या घातक परिणामांविषयी माहिती देत आरोग्यदायी व तंबाखूमुक्त समाज घडविण्याचा संदेश देण्यात आला.

# महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करा-जिल्हाधिकारी



**वाशिम** : नागरिकांना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ प्रभावीपणे अंमलात आणण्यात यावा, अशा सूचना जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिल्या.

राजे वाकाटक सभागृहात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले की, या अधिनियमान्वये नागरिकांना शासकीय विभागांकडून अधिसूचित सेवा निश्चित कालमर्यादेत मिळणे बंधनकारक आहे. सध्या राज्य शासनाच्या ३७ विभागांतील एकूण १००१ लोकसेवा अधिसूचित आहेत. नागरिकांनी या सेवा 'आपले सरकार पोर्टल' वरून ऑनलाईन प्राप्त करून घ्याव्यात, असे त्यांनी आवाहन केले. तसेच, प्रत्येक शासकीय कार्यालयाने त्यांच्या अधिसूचित सेवांचा फलक दर्शनी भागात लावणे बंधनकारक असल्याने याची तात्काळ अंमलबजावणी करण्याचे निर्देशही जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. या बैठकीत जिल्हा प्रकल्प प्रमुख सौरभ जैन यांनी सविस्तर माहिती सादर केली. जिल्हा वार्षिक योजना व अनुसूचित जाती उपयोजना २०२५-२०२६ चा आढाव या बैठकीदरम्यान जिल्हाधिकारी कुंभेजकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा वार्षिक योजना तसेच अनुसूचित जाती उपयोजना २०२५-२०२६ च्या अंमलबजावणीचा आढावा घेतला. मंजूर नियतव्यय, प्रशासकीय मान्यता, निधी वितरण, स्पील निधी यांसंबंधी विभागांच्या कामकाजाची स्थिती तपासण्यात आली.

# भारत घेणार तंत्रज्ञानाची नवी झेप

## तिसऱ्या इयत्तेपासून कॉम्प्युटर नव्हे, आता 'AI' चा धडा!

**नवी दिल्ली** : भारतातील शिक्षण क्षेत्रात एक अत्यंत महत्त्वाचा आणि दूरगामी परिणाम करणारा बदल लवकरच होणार आहे. एप्रिल २०२६ मध्ये सुरू होणाऱ्या नवीन शैक्षणिक सत्रापासून कृत्रिम बुद्धिमत्ता औपचारिकपणे शालेय शिक्षणाचा भाग म्हणून समाविष्ट करण्याची तयारी केंद्र सरकारने सुरू केली आहे.



शिक्षण मंत्रालयाने घेतलेल्या निर्णयानुसार, पुढील वर्षीच्या नवीन सत्रापासून तिसऱ्या इयत्तेतील विद्यार्थ्यांपासूनच हा AI अभ्यासक्रम विकसित केला जाणार आहे. हा अभ्यासक्रम देशातील सर्व राज्यांमधील शालेय विद्यार्थ्यांसाठी लागू होईल. प्राथमिक स्तरावर 'स्किल इंडिया इकोसिस्टम' मध्ये या विषयाचा समावेश करण्याच्या योजनेवर शिक्षण मंत्रालय वेगाने काम करत आहे.

शालेय शिक्षण आणि साक्षरता विभागाचे सचिव संजय कुमार यांनी या महत्त्वपूर्ण निर्णयाची घोषणा केली. AI अर्थव्यवस्थेत नवीन नोकरीच्या संधींसाठीच्या रोडमॅपवरील नीती आयोगाच्या अहवालाच्या लॉंचिंगच्या वेळी त्यांनी ही माहिती दिली.

# एआयमुळे भविष्यात कामाचे स्वरुप बदलणार !

## अच्युत गोडबोले यांचे मत



**पुणे** : प्रसिद्ध संगणकतज्ज्ञ आणि साहित्यिक अच्युत गोडबोले यांनी म्हटले आहे की, आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) तंत्रज्ञानामुळे भविष्यात कामाचे स्वरूप बदलणार आहे. या बदलाचा स्वीकार करणे आवश्यक आहे, अन्यथा आपण मागे पडू.

ते प्रसिद्ध वास्तुविशारद शिरीष दसनूरकर यांच्या 'शिरीषबोली' या काव्यसंग्रहाच्या प्रकाशन सोहळ्यात आणि त्यांच्या पाचव्या चित्र प्रदर्शनाच्या उद्घाटनावेळी बोलत होते. हा कार्यक्रम सेनापती बापट रोडवरील दर्पण आर्ट गॅलरी येथे पार पडला. यावेळी अच्युत गोडबोले आणि अभिनेत्री मृणाल कुलकर्णी यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

अनेक चित्रकारांनी एआयवर त्यांच्या शैलीतील चित्रे चोरल्याबद्दल खटले दाखल केले आहेत. संगीत, सिनेमा आणि चित्रकला यांसारख्या अनेक क्षेत्रांमध्ये एआयच्या वाढत्या प्रभावामुळे भविष्यात गोंधळाचे वातावरण निर्माण होऊ शकते. पुढील १० ते १५ वर्षांत, म्हणजेच २०३५-४० पर्यंत अनेक मोठे बदल अपेक्षित आहेत. यामुळे कामाचे स्वरूप बदलणार असून, आपण सतर्क राहून नवीन गोष्टींचा स्वीकार केला पाहिजे, अन्यथा आपण मागे पडू, असे गोडबोले यांनी सांगितले. यावेळी अभिनेत्री मृणाल कुलकर्णी यांनी वेळ आणि पैशाचा सदुपयोग कसा करावा, याचा प्रत्येकाने विचार करण्याची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त केले.

कार्यक्रमात दसनूरकर यांच्या हस्ते गोडबोले आणि कुलकर्णी यांचा चित्र भेट देऊन सत्कार करण्यात आला. दसनूरकर यांनी त्यांच्या चित्र आणि पुस्तक विक्रीतून मिळालेला निधी 'मेक माय ड्रीम फाउंडेशन', 'अक्षरसरिता' आणि 'उमेद फाउंडेशन' या तीन सामाजिक संस्थांना प्रदान केला.

गोडबोले म्हणाले की, अलिकडच्या काळात आर्टिफिशियल इंटेलिजन्स तंत्रज्ञानाने सर्वत्र प्रभाव टाकला आहे. या तंत्राने अनेक चित्रकारांनी रेखाटलेली चित्रे जशीच्या तशी साकारली आहेत, ज्यामुळे चित्रकारांमध्ये भीतीचे वातावरण आहे. एआय तंत्रज्ञान डेटावरून पॅटर्न शिकते, त्यामुळे सर्व क्षेत्रांतील कर्मचाऱ्यांमध्ये चिंता वाढली आहे.

**पिंगलाक्षी एक्सप्रेस** (मराठी साप्ताहिक ) । R.N.I. No. MAHMAR/2008/24720

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक गजानन श्रीराम बानोरे यांनी दिप प्रिंटर्स (मुद्रक - राम उत्तमराव सालवणकर) वारा जहां. ता.जि.वाशीम येथे छापून कार्यालय, साप्ता. पिंगलाक्षी एक्सप्रेस, सिध्दी विनायक शिक्षक कॉलनी, मु.पो. ता. रिसोड जि. वाशीम (महा.) येथून प्रकाशित केले. (सर्व वाद रिसोड न्यायालया अंतर्गत) प्रकाशित असलेल्या सर्व लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी.आर.बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार)

